Shivaji College Dist. Hingoli

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -28 , Vol. 4 | March 2020 | Peer Reviewerd

# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 28, Vol. 4**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
**Dr. B. G. Gaikwad**
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

***Editor***
**Dr. Balasaheb S. Kshirsagar**
Director, Gandhi Study Center
Shivaji College, Hingoli (MS)

***Co-Editor***
**Dr. Dhale S.U.**
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

***Co-Editor***
**Dr. Hurgule N.R.**
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)

**Shaurya Publication, Latur**

Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

40. महात्मा गांधीजींचे सत्य व अहिंसेविषयक विचार 118

कु. मोरे सीमा लक्ष्मण.

41. "21 व्या शतकात महात्मा गांधीच्या विचारांची उपयुक्तता" 121

प्रा.डॉ.विलास गायकवाड

42. महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार - एक अध्ययन 125

डॉ. जी आर पवार

43. मद्यपानबंदी आणि गांधीवाद:एक दृष्टिक्षेप 129

डॉ.प्रकर्ष सुभाषराव देशमुख

44. म. गांधीजींचे आरोग्य विषयक विचार 135

डॉ. संदिप चांदूजी लोंढे.


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Hingoli

# SHIVAJI COLLEGE, HINGOLI - 431513 (MS)

NAAC Accredited with 'B' Grade

Affiliated to - Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

**Organized by - Gandhian Studies Center, Shivaji College, Hingoli**

**Sponsored by - University Grants Commission, New Delhi**

# ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL LEVEL CONFERENCE

**on**

## RELEVANCE OF MAHATMA GANDHI IN TODAY'S WORLD

Sunday, 15 March 2020

# *Certificate*

This is to certify that **Dr.G.R.Pawar** from **Shivaji College, Hingoli** has participated in the UGC sponsored One D Interdisciplinary National Level Conference on **Relevance of Mahatma Gandhi in Today's World** organized by Gandh Studies Center, Shivaji College, Hingoli Tq.Dist.Hingoli, Maharashtra, India on 15 March 2020.

He presented research paper entitled महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार – एक अध्ययन.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

| Dr. B.G.Gaikwad | Dr.Balasaheb S.Kshirsagar | Dr.Dhale S.U. | Dr.Hurgule N.R |
|---|---|---|---|
| Principal & Organizing Secretary | Convener & Coordinator-GSC | Co-convener | Co-convener |

Shivaji ... Dist

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 28 , Vol. 4 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार - एक अध्ययन

**डॉ. जी आर पवार**
ग्रंथपाल, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

भारतातील सर्वात प्रभावशाली महापुरूषामध्ये महात्मा गांधीचे नाव वरच्या दर्जाचे आहे. त्यांना राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते. वर्षानुवर्षे पारतंत्र्यात दडपल्या गेलेल्या भारतीयांना निर्भय बनवून त्यांच्यातील नैतिक शक्ती व आत्मविश्वास जागृत केला. भारतीय स्वातंत्र्य लढयातील त्यांचे योगदान महत्वाचे आहे. स्वातंत्र्य लढयासाठी त्यांनी अहिंसक मार्गाचा अवलंब केला. भारतीय जनतेत प्रथम आत्मविश्वास निर्माण केला. साधी राहणी व उच्च विचारसरणीचा वैयक्तिक जीवनात स्विकार केला. राजकीय क्षेत्रात कार्य करताना जे विचार व्यक्त केले त्या विचारांना आज गांधीवाद म्हणुन महत्त्वाचे स्थान आहे.

महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते. भारतालाअहिंसक मार्गानी लढा देउन पारतंत्र्यातुन स्वतंत्र करण्याचे कार्य सर्वप्रथम महात्मा गांधीनी केले. भारतीय जनतेत प्रथम आत्मविश्वास निर्माण केला. साधी राहणी व उच्च विचारसरणी या न्यायाने त्यांनी आपले जीवन घालविले. राजकीय क्षेत्रात कार्य करताना शिक्षण क्षेत्रातही त्यांनी कार्य केले.आपले शैक्षणिक विचार मांडले. त्यांनी आपली स्वतंत्र शिक्षणपद्धती सुचविली. त्यांच्या शैक्षणिक विचारांना आजही महत्त्वाचे स्थान आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

महात्मा गांधीच्या शैक्षणिक विचाराचे महत्त्व लक्षात घेऊन पुढील उद्दिष्टानुसार विषयाची मांडणी केली आहे.

१) महात्मा गांधीच्या शैक्षणिक विचाराचा अभ्यास करणे.

२) महात्मा गांधीच्या विचाराच्या उपयुक्ततेचा शोध घेणे.

**महात्मा गांधीचे शिक्षणविषयक विचार**

१९३७ रोजी वर्धा येथे एक सभा बोलाविली होती. त्या सभेत त्यांनी 'नई तालीम' 'बुनियादी शिक्षा', 'मूलोद्योगी शिक्षण (Basic Education) यांचा पुरस्कार केला होता. त्यांनी शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली.

त्यांच्या मते, "केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण म्हणता येणार नाही, शिक्षणाची सुरवात पण नाही, तर माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय."[१]

**गांधीजींचे शैक्षणिक विचार**

महात्मा गांधींनी आपले शिक्षणविषयक विचार इ.स.१९०८ रोजी 'हिंद-स्वराज्य' या पुस्तकात सविस्तर मांडले आहे. त्यांनी वर्धा-शिक्षण, मूल्योद्योग, शिक्षण, जीवन शिक्षण, नई-तालीम या नवीन शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केला. स्वावलंबन, स्वाभिमान, श्रम प्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली योजना तयार केली होती. इ.स.१९३७ मध्ये वर्धा येथील परिषदेत महात्मा गांधीनी आपले शिक्षणविषयक विचार मांडले.[२] त्यानुसार एक योजना तयार करण्यात आली. या योजनेला "मूलोद्योग शिक्षण योजना" या नावाने परिचित आहे. या योजनेची वैशिष्ट्ये म्हणजेच महात्मा गांधीचे शिक्षणविषयक विचार होत. याच मूलोद्योगी शिक्षणाची मूलतत्त्व म्हणून ओळखली जातात. १. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे २. शिक्षण मोफत व सक्तीचे असावे ३. शिक्षणात हस्तव्यवसायास प्राधान्य असावे ४. स्वावलंबी शिक्षण ५. शिक्षणात समन्वयाचे तत्त्व अंमलात आणावे ६. मानसशास्त्रीय आधारावर शिक्षण.

**मूलोद्योगी शिक्षण : (Basic Education)**

महात्मा गांधीनी मूलोद्योगी शिक्षण पद्धती भारतात लागू करण्यासाठी व तिचे स्वरूप कसे राहील याविषयी महाराष्ट्रातील वर्धा येथे इ.स. १९३७ रोजी डॉ. झाकिर हुसेन यांचे अध्यक्षतेखाली एक परिषद बोलाविली होती. त्या परिषदेत महात्मा गांधीनी आपले शैक्षणिक विचार प्रकट केले. या परिषदेत एक शिक्षण योजना आखण्यात आली. या योजनेस मूलोद्योगी शिक्षण योजना (Scheme of Basic Education) असे म्हणतात. पुढे ही योजना 'जीवन शिक्षण, बुनियादी शिक्षण, नई तालीम' या नावाने ओळखली जाऊ लागली. ही शिक्षण योजना वर्धा या ठिकाणी तयार करण्यात आली होती. म्हणून ही योजना 'वर्धा शिक्षण योजना' या नावानेही प्रसिद्ध आहे.[३]

**मूलोद्योगी शिक्षणाचे स्वरूप**

गांधीजींच्या मतानुसार शिक्षण प्रक्रियेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील.

**१. पायरी पहिली**

पहिल्या दिवशी बालकाची क्षमता पाहून त्यांना वाचन, लेखन व भूगोल येतो की नाही याची शहानिशा करणे.

**२. पायरी दुसरी**

बालकांना टकळीवर सूत कातण्यास किंवा इतर मूलोद्योग शिक्षण देणे गरजेचे आहे. याचे कारण टकळी परंपरागत हस्तकलेत मोडते. त्यात व्यक्तीची सर्जनशीलता विकसित होते.

**३. पायरी तिसरी**

टकळीचे स्थान रोजच्या जीवनात कोणते असावे याची माहिती बालकांना देऊन त्याविषयी

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 28 , Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

आढावा घेणे गरजेचे आहे.

४. पायरी चौथी

यात टकळीची रचना बालकांना शिकवावी. त्यानंतर त्याची शास्त्रोक्त माहिती विशद करावी.

५. पायरी पाचवी

सूत ज्या वस्तूपासून काढावयाचे आहे त्याविषयी (उदा. कापूस) महिती द्यावी. कापूस कोठे तयार होतो ते ठिकाण व विविधता यांची माहिती देणे.

६. पायरी सहावी

सूताचे आडवे उभे धागे मोजणे, सूत मोजणे, इत्यादी क्रियाद्वारे बालकांना गणिताचे शिक्षण द्यावे.

**मूलोद्योगी शिक्षणाचा अभ्यासक्रम**

मूलोद्योगी शिक्षण अभ्यासक्रमाची आखणी वर्धा येथे इ.स.१९३७ रोजी केली होती. डॉ झाकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासक्रम तयार करण्याकरिता एक समिती गठित करण्यात आली होती. त्यांनी खालील अभ्यासक्रमाची शिफारस केली.

१. हस्तव्यवसाय

स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन हस्तकलेची निवड करावी. यात कृषी, हातसूत व हातमाग, मत्स्यपालन, चामड्याचे काम, मातकाम, फळे व भाजीपाला यांचा समावेश होतो. यामुळे बालकांमध्ये काम करण्याप्रती निष्ठा व स्वावलंबनाची भावना निर्माण होऊ शकेल.

२. मातृभाषा

मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर देण्यात आला. मातृभाषेतूनच बालक आपले विचार दुसऱ्यापर्यंत प्रकट करू शकतो. त्यामुळे दुसऱ्याचे विचार व भावना समजू शकतो.

३. गणित

गणिताच्या अध्ययनाने हस्तकला शिकण्यास, समजण्यास व येणाऱ्या समस्या सोडविण्यास उत्तेजन मिळते. यासाठी अंकगणिताचे प्रश्न व भूमिती समस्या सोडविण्यासाठी गणित शिक्षणाची गरज भासते.

४. सामाजिक अभ्यास

या विषयाच्या अभ्यासात इतिहास, भूगोल नागरिकशास्त्र, यांना स्थान देण्यात आले आहे. या विषयांच्या अभ्यासामुळे बालकात नागरिकतेची भावना वाढीस लागते. आंतरराष्ट्रीय भावनेसही चालना दिली जाते.

५. चित्रकला

सुरूवातीस चित्रकला हस्तकलेल्या स्वरूपात शिकविण्यात यावी. नंतर अलंकारित व आरेखन शिकविण्यात यावे. त्यामुळे बालकात सौंदर्यदृष्टीची क्षमता वाढीस लागते. त्यांना चित्र काढण्याची व ते रंगविण्याची अभिरूची निर्माण होते.

६. संगीत

मूल्योद्योगी शिक्षणात हस्तकला, चित्रकला आणि संगीत एकत्र शिकविण्यात यावे. बालकाच्या मनात अभिरूची वाढीस लावण्यासाठी हस्तकला, चित्रकला, शारीरिक व्यायाम आणि संगीत एकत्रितपणे शिकविण्यात यावे.

७. सामान्य विज्ञान

यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र, शरीरशास्त्र यांचा समावेश होतो. या शास्त्रांच्या अध्ययनाद्वारे बालकात निरीक्षण, परीक्षण व प्रयोग करण्याची क्षमता वाढविली जाते. शास्त्रज्ञांच्या जीवनकार्यावरून बालकात त्याग, तपस्या व समर्पण भावनेचा विकास होऊ शकतो.

८. आरोग्य शिक्षण

बालकांना व्यायाम, योगासन, विविध खेळ याद्वारे शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे बालकांचे आरोगय चांगले राहील. तसेच त्यांना संतुलित आहाराचे महत्त्व शिक्षणाद्वारे समजावून देणे गरजेचे आहे.

**गांधीजींच्या मतानुसार शिक्षणाचे ध्येय (Aims of Education)**

म. गांधीजींनी शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

**१. चरित्र्याची जडणघडण**

गांधीजींच्या मतानुसार शिक्षणाने चारित्र्याची जडणघडण केली जाते. चारित्र्याची घडण म्हणजे विविध गुणांची जोपासना करणे व ते गुण विर्थ्यांत संक्रमित करण्याचा प्रयतन करणे होय. जर शिक्षण चारित्र्य जडणघडणीत उपयोगी पडत नसेल तर ते शिक्षण कुचकामाचे आहे. यात संयम, सदाचार, सत्याग्रह, सहिष्णुता स्वावलंबन, आत्मनिर्भरता इत्यादी गुणांचा अंतर्भाव होतो. यामुळे चारित्र्यवान नागरिक निर्माण करता येतो.

**२. सर्वांगिण विकास**



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 4
March 2020
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

शिक्षणाचे सर्वात मूलभूत ध्येय म्हणजे बालकाचा सर्वांगीण विकास करणे हे होय. विार्थ्यांचा शिक्षणातून शारीरिक, मानसिक, भावनिक विकास करता यायला हवा. ते शारीरिक विकासाकडे अधिक भर देत असत. ते बुद्धी (Head), भावना (Heart) आणि हस्त (Hand) यांद्वारे ज्ञानात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक विकास करण्यावर अधिक भर देत. यासाठी गांधीनी शिकणे, लिहिणे व गणित याऐवजी बुद्धी, भावना व हाताच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले होते. यामुळे बालकाचा सर्वांगीण विकास होऊ शकेल.

**३. आध्यात्मिक विकास**

बालकाच्या जीवनाचे जे अंतिम ध्येय असते तेच ध्येय शिक्षणातून साध्य व्हावे असे गांधीजींना वाटते. 'मुक्त करते ते शिक्षण' योग्य शी त्यांची धारणा होती. आध्यात्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाल्यास ईश्वराचे ज्ञान व आत्मानुभूती प्राप्त होऊ शकते. आत्मविकासातून आत्मसाक्षात्कार झाल्यास बालकाची आध्यात्मिक प्रगती करता येते अशी त्यांची धारणा होती.

**४. कृतीद्वारे शिक्षण**

योग्य शिक्षण कृतिद्वारे दिले जावे. गांधीजींच्या मतानुसार शिक्षणाचा अर्थ केवळ बालकांच्या डोक्यात ज्ञान कोंबणे नव्हे तर सर्व इंद्रियांचा वापर करणे हा आहे. प्रत्यक्ष कृतीने बालकास जे ज्ञान व अनुभव मिळतो त्यास खरे शिक्षण म्हणता येईल. कृतीद्वारे शिक्षण दिल्याने लोकांच्या मनात काम करण्याप्रती प्रतिष्ठेची भावना निर्माण होईल व ते शारीरिक कामे करण्यास पुढे सरसावतील 'कमवा आणि शिका' हे सूत्र यास तंतोतंत लागू पडते.

**५. अर्थोत्पादनक्षम शिक्षण**

स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःच्या कुटुंबाचे पालन पोषण करण्याची क्षमता बालकात शिक्षणाच्या माध्यमातून आली पाहिजे. गांधीच्या मते बालकांना व्यावसायिक शिक्षण दिल्यास अर्थोत्पादन करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होईल. त्यामुळे शिक्षणाचे ध्येय अर्थोत्पादनक्षम शिक्षण देणे हेच असावे.

**६. सांस्कृतिक शिक्षण देणे**

सांस्कृतिक वारसा, भावीपिढीकडे संक्रमित करणे हे एक शिक्षणाचे ध्येय आहे. ज्या शिक्षणातून आपल्या संस्कृतीचा आविष्कार होईल असे शिक्षण बालकांना देणे सोयीचे होईल असे गांधीजींना वाटे. वादविवाद, चर्चासत्रे, श्रमदान, ग्रामसफाई अशा कार्यक्रमाद्वारे बालकात सांस्कृतिक शिक्षण देऊ शकतो.

**७. सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे**

माणूस समाजशील प्राणी आहे. समाजात तो राहूनच आपले कार्य करीत असतो. म्हणून समाजशिवाय व्यक्तीची प्रगती व व्यक्ती विकासाशिवाय समाजाची आणि राष्ट्राची प्रगती होऊ शकत नाही. म्हणून समाज आणि व्यक्ती यांचा ध्येये परस्परपूरक ठरतात. याकरिता बालकात जबाबदारीची जाणीव शिक्षणाने निर्माण करणे आवश्यक आहे.

**अध्ययन अध्यापन पद्धती**

गांधीजींनी बालकांना शिकविताना कोणत्या अध्ययन व अध्यापन पद्धतीचा वापर करावा यांची चर्चा केलेली आहे. त्यांनी खालील पद्धती सुचविलेल्या आहेत.

**१. कृतिद्वारे शिक्षण**

गांधीजींच्या मते शिक्षण शरीर अवयवांच्या माध्यमातून योग्य प्रकारे देता येते. डोळे, नाक, कान, हात, पाय इ. शरीर अवयवाच्या वापराने शिक्षण देणे सुलभ जाते. अध्ययनात बालकांच्या विविध कृतींना वाव मिळतो.

**२. स्वानुभवातून शिक्षण**

अध्यापकांनी बालकांना जास्तीत जास्त स्वानुभवाने शिकण्याची प्रेरणा दिली पाहिजे. हे अनुभव बालकांच्या दैनंदिन जीवनातील असावे. जीवन आणि शिक्षण यांचा मेळ घालणे गरजेचे असते.

**३. समन्वयातून शिक्षण**

शिकविताना सर्व विषय एकसंघ आहेत याची भावना बालकात रूजवणे आवश्यक आहे. विविध विषयांचा जीवन आणि शिक्षणात समन्वय साधणे शिक्षकाचे काम आहे. चर्चा व्याख्यान, बौद्धिके यांचा शिकविताना वापर करता येईल.

**सारांश**

आज देशाच्या स्वातंत्र्याला ७० वर्ष पूर्ण झाले. परंतु स्वातंत्र्यानंतरही महात्मा गांधींचे शिक्षणविषयक विचार प्रत्यक्षात आले नाहीत. त्यांनी वर्धा-शिक्षण, मूल्योद्योग, शिक्षण, जीवन शिक्षण, नई-तालीम या नवीन शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केला. स्वावलंबन, स्वाभिमान, श्रम प्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली योजना तयार केली होती. परतू त्यांचे अनुयायी म्हणणारे शासनाने याकडे दुर्लक्ष केने आहे. वर्तमान सर्व समस्याचा उपाय गांधीं विचारात आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या आणि स्पर्धेच्या युगात स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची जागा खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाने घेतली आहे. म्हणून देशातील अनेक मूळ प्रश्न जसेच्या तसे राहिलेले दिसतात.

**संदर्भ सूची :-**



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

# CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 28 , Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139



१) डॉ. के.यु. घोरमोडे, डॉ. कला घोरमोडे.,शैक्षणिक विचारवंत,
२) साठे, डॉ. शांता, काय सांगू ? कसं सांगू?, राजहंस प्रकाशन, पुणे
३) भागवत, शोभा, आपली मूल, राजहंस प्रकाशन, पुणे
४) मारूलकर, डॉ. विजय : समाजशास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर
५) शिखरे, दा. न.,खंड ७ वा,(संपादक.), (१९९५.) गांधी विचार दर्शन (हरिजन),महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे.
६) गांधी, मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर,२००८
७) गांधी, मो. क., माझ्या स्वप्नाचा भारत, परधान प्रकाशन, पवनार, वर्धा, २००७
८) पटवर्धन, अप्पा, मंगल प्रभात, परधान प्रकाशन, पवनार, वर्धा, २००७
९) गांधी, मो. क., हिंदस्वराज्य, परधान प्रकाशन, वर्धा, २००७
१०) भारदे, बाळासाहेब, (१९९३),गांधी विचारमीमांसा, पुणे, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन गांधी भवन कोथरूढ,


********



| Net nount | 99 | 99 | 12 | 86 | 09 | 09 | 63 | 63 | 63 | 63 | 33 | 9 | 34 | 30 | 44 | 236 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|